# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

gacjalgaon@gmail.com 0257-2996423

जा.क्र./शाआमज/आस्था/वसतिगृह/इमारत/भाडे/ 599 /2026 दि. 11 FEB 2026

## जाहीरात सुचना

**शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव या संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहासाठी भाडेतत्वावर इमारत घेणेबाबत.**

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव या संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाकरिता जळगांव शहर व परिसरात 400 चौ.फुट Carpet Area स्वतंत्र स्वच्छता गृहासह 04 विद्यार्थ्यांकरिता याप्रमाणे 500 विद्यार्थ्यांसाठी खाजगी इमारत शासन ठरवेल त्या भाडेदरानुसार पुढील 3 वर्षे किंवा मौजे चिंचोली ता.जि.जळगांव येथील शासकीय वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घेडेल त्याकालावधीपर्यंत भाडेतत्वावर घ्यावयाची आहे.

तरी वरील प्रमाणे इमारतीचे क्षेत्रफळ असलेले Flats भाडेतत्वावर देण्यास इच्छुक असलेल्या इमारत मालकांनी इमारतीच्या मालकीहक्कासंबंधीची संपूर्ण कागदपत्रे, नकाशे यासह आपला प्रस्ताव अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, श्री.गुलाबराव देवकर अभियांत्रीकी महाविद्यालय परिसर, शिरसोली रोड, जळगांव येथे दि. 16.02.2026 ते दि. 27.02.2026 या कालावधीत प्रत्यक्ष सादर करावा.

जळगांव शहरातील महाबळ, रायसोनी नगर, डी.एस.पी.चौक, आकाशवाणी चौक, रिंग रोड परिसर, एम.जे. कॉलेज परिसर, सिंधी कॉलनी परिसरातील इमारतींना प्राधान्य देण्यात येईल.

इमारत भाडेतत्वावर देणेबाबतची संपूर्ण माहिती तथा अटी व शर्ती www.gacjalgaon.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

डॉ.ना.सु.गंगासागरे<br>
अधिष्ठाता<br>
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

D:\santosh\स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात\Letter.docx1

महाराष्ट्र शासन

# शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव

श्री.गुलाबराव देवकर अभियांत्रीकी महाविद्यालय परिसर,शिरसोली रोड, जळगांव.

ईमेल-gacgalgaon@gmail.com Website-www.gacjalgaon.com

☎-०२५७-२९९६४२३

## शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव या संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहासाठी भाडेतत्वावर इमारत घेणेसंदर्भातील अटी व शर्ती

1. इमारतीचा ताबा हा इमारत भाडेतत्वावर घेतल्यापासुन पुढील 3 वर्षे किंवा मौजे चिंचोली ता. जि. जळगाव येथील प्रस्तावित बांधकाम पूर्ण होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत राहील. असे असले तरीही इमारत मालक अथवा भाडेकरु यांना मुदतपुर्वी इमारतीचा ताबा कोणत्याही परिस्थितीत सोडावयाचा झाल्यास अथवा भाडेकरार रद्द करावयाचे झाल्यास त्याबाबतची 03 महिन्याची लेखी पुर्वसुचना देणे आवश्यक राहील.
2. सदर इमारतीवरील ग्रामपंचायत/महानगर पालिका कर, किंवा अन्य लागु असलेले कर इ. च्या रकमा भरण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहील.
3. शासनाने मंजुर केलेल्या दरानुसार इमारत भाडे रक्कम अदा करण्यात येईल. तसेच सदर भाडे रक्कम निधी मंजुरी/उपलब्धतेनुसार अदा केली जाईल.
4. सदर इमारत वापराच्या अनुषंगाने येणा-या अडी-अडचणीचे निराकरण इमारत मालकाने करुन देणे आवश्यक राहील.
5. इमारतीच्या जागेमध्ये वसतिगृहाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार फेरबदल इमारत मालकास करुन देणे आवश्यक राहील.
6. इमारत मालकाने सदर जागेमधील विद्युतीकरण, पाणीपुरवठा, इमारतीसमोरील सांडपाण्याची नाली बंधिस्त करुन देणे, ड्रेनेज व्यवस्था, पाण्याची व्यवस्था करुन देणे आवश्यक राहील. तसेच सदर जागेमध्ये आवश्यकतेनुसार डागडुजी/दुरुस्त्या, रंगरंगोटी करुन देणे इमारत मालकास आवश्यक राहील.

11.2.26

डॉ.ना.सु.गंगोसागरे

अधिष्ठाता,

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

प्रति,
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

विषय :- वसतिगृहासाठी इमारत भाडेतत्वावर देणेबाबत

संदर्भ :- आपली दैनिक -------------------------- या वर्तमानपत्रातील जाहिरात
दि. -----------

महोदय,

उपरोक्त संदर्भित जाहिरातीस अनुसरुन मी खालील तपशिलानुसार माझी इमारत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव यांना वसतिगृहासाठी शासन ठरवेल त्या दरानुसार पुढील 3 वर्ष किंवा मौजे चिंचोली ता.जि.जळगांव येथील शासकीय इमारतीमध्ये विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम पुर्ण होईल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत भाडेतत्वावर देऊ इच्छितो. सदर इमारतीचा तपशिल खालील प्रमाणे आहे. सोबत विहित नमुण्यातील हमीपत्र सादर करत आहे. तरी कृपया विद्यार्थी वसतिगृहासाठी इमारत भाडेतत्वावर घेण्यात यावी, ही विनंती.

| अ.क्र. | बाब | माहितीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | इमारत मालकाचे नाव. | |
| २ | भाडेतत्वावर द्यावयाच्या इमारतीचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | इमारतीच्या संपूर्ण जागेचे क्षेत्रफळ | |
| ४ | इमारतीच्या बांधकामाचे क्षेत्रफळ | |
| ५ | इमारतीमधील एकूण खोल्या, प्रसाधनगृहे | |
| ६ | इमारतीमधील पाण्याची / विद्युत व्यवस्था | |
| ७ | इमारत किती मजली/बहूमजली असल्यास वरच्या मजल्यावर जाण्यासाठी व्यवस्था | |
| ८ | इमारत बांधकाम परवाण्याची प्रत /पूर्णत्वाचे (Building completion certificate) प्रमाणपत्र, इमारतीचे फोटो | |
| ९ | मंजूर ले-आऊट | |
| १० | सोबत इमारतीच्या बांधकामाचा मंजूर नकाशा सादर केला आहे काय? | |
| 11 | कर भरणा केल्याची पावती | |
| १२ | बसस्टँड/रेल्वेस्टेशन पासूनचे अंतर | |
| १३ | इमारतीजवळील मेन रोड/वसाहतीचे नाव | |
| १४ | अपेक्षित इमारत भाडे रक्कम | |
| १५ | इमारत मालकाच्या अन्य अटी व शर्ती असल्यास त्या नमुद कराव्यात. | |

आपला विश्वासू

प्रति,

दि.

अधिष्ठाता,

शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव.

हमीपत्र

सदर इमारत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव यांनी भाडेतत्वावर घेतल्यास त्याच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांचेकडून सदर इमारतीचे भाडे मुल्यांकन प्रमाणपत्रानुसार जी रक्कम निश्चित होईल त्यानुसार निश्चित झालेली रक्कम मला मान्य राहील व सदर भाडे मुल्यांकन दरानुसार माझी इमारत पुढील 3 वर्ष किंवा मौजे चिंचोली ता.जि.जळगांव येथील शासकीय इमारतीचे बांधकाम पुर्ण होईल यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यंत शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, जळगांव यांना विद्यार्थी वसतिगृहासाठी भाडेतत्वावर देण्यास व त्याप्रमाणे करारपत्र करुन देण्यास माझी संमती राहील.

तसेच सदर इमारत विद्यार्थी वसतिगृहासाठी इमारत भाडेतत्वावर घेतल्यास त्याच्या संपूर्ण कराच्या रक्कमेचा भरणा करण्याची जबाबदारी माझी राहील. तसेच आवश्यकतेनुसार इमारतीमधील अंतर्गत फेरफार मी स्वखर्चाने करुन देण्याची माझी जबाबदारी राहील. त्याचप्रमाणे सदर संस्थेच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचा-यांशी माझा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध नाहीत. तसे आढळुन आल्यास माझा प्रस्ताव नाकारण्यात यावा किंवा अपात्र समजण्यात यावे.

इमारत मालकाचे नाव:-

स्वाक्षरी.